


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीची प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २०९ वा गुरूवार दि ०९ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बोगस दिव्यांग प्रमाणपत्राचा लाभ लाटणाऱ्यावर येणार गंडातर!

## दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी करा!-तुकाराम मुंढेंचे सिइओंना निर्देश!

जनसंचलन/बुलढाणा

दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी व शारिरीक तपासणी करा तसेच दिव्यांग हक्क अधिनियमानुसार कार्यवाही करा, असे स्पष्ट निर्देश दिव्यांग कल्याण विभागाचे सचीव तुकाराम मुंढे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत. **बुलढाणा जिल्ह्यात ५०० च्या वर शिक्षकांनी बोगस दिव्यांग शिक्षकांनी लाटल्याच्या तक्रारी आहेत.जिल्हा प्रशासन दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी तसेच शारिरीक तपासणी करण्यात उदासीन दिसून येत आहे.** दरम्यान दिव्यांग कल्याण विभागाचे सचीव तुकाराम मुंढे यांनी जिल्हा परिषदेचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना यासंदर्भात पत्राद्वारे निर्देश दिले आहेत.त्यांनी पत्रात म्हटले की, जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असणाऱ्या दिव्यांग अधिकारी व कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे दिव्यांग प्रमाणपत्राचे युडीआयडी कार्ड आधारे शासनाच्या विविध सवलतींचा जसे की बदली, सरळसेवा नियुक्ती,पदोन्नती, अतिरिक्त प्रवास भत्ता आदी लाभ घेतात.तथापि, दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्र वैधतेबाबत विभागास अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींमध्ये दिव्यांगांचे वैश्विक ओळखपत्रा बाबत साशंकता व्यक्त केलेली आहे. त्यामुळे सदर दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करणे तसेच शारिरीक तपासणी करणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या अनुषंगाने दिव्यांगांचे सक्षमीकरण करणे तसेच सदर अधिनियमान्वये प्राप्त झालेले लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचणे अभिप्रेत आहे. आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या (शिक्षण, आरोग्य, बांधकाम विभाग तसेच सर्व विभागांतर्गत) सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतरसह यांच्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात यावी. पडताळणी अंती लाक्षणीक दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांगांनाच अनुज्ञेय लाभ देण्यात यावा. दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र चुकीचे, बनावट आढळल्यास किंवा प्रमाण ४० टक्यांपेक्षा कमी असेल तर अशा दिव्यांगांना सदर लाभ अनुज्ञेय करण्यात येऊ नये. त्यांना दिलेले लाभ बंद करुन, त्यांनी आता पर्यंत घेतलेल्या लाभा बाबत कारवाई करण्यात यावी.तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६ च्या कलम ९१ मध्ये स्पष्ट केलेल्या तरतूदी अनुसार लक्षणीय दिव्यांगत्त्व असणाऱ्या व्यक्तीस अभिप्रेत असणारा कोणताही लाभ, सवलत जर अन्य पात्र नसलेल्या व्यक्तीने प्राप्त करून घेतला किंवा घेण्याचा प्रयत्न केला तर संबंधित व्यक्ती २ वर्षापर्यंत कारावास किंवा रुपये एक लक्ष पर्यंत दंडासाठी किंवा या दोन्ही शिक्षांसाठी पात्र ठरते. या तरतुदी नुसार पडताळणी अंती अपात्र ठरवण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. याबाबतचा अहवाल आयुक्त, दिव्यांग कल्याण,पुणे व विभागास तीस दिवसांत सादर करण्यात यावा असे पत्रात म्हटले आहे.




**बोगस दिव्यांग / अस्तित्वंग प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यानी आर्थिक लाभापोटी खैराती सारखे वाटून त्या पैश्यातून गडगंज संपत्ती जमा केली असून त्यांची पूर्व परिस्थिती व आजची परिस्थिची उच्चस्तरीय चौकशी करून फोजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी तक्रारकर्त्यांनी केली आहे**

अजून बरेच काही पुढील भागात

---

# बुलढाण्यातून कोमलताई झंवर यांचे नाव आघाडीवर!

## सर्वांना चालणारे, सर्व समाजाला जोडणारे नेतृत्व!

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची चाहूल लागताच बुलढाणा शहरात राजकीय समीकरणे वेगाने बदलू लागली आहेत. नगराध्यक्षपद महिला ओपन प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने इच्छुक महिलांमध्ये चुरस निर्माण झाली आहे. मात्र, या साऱ्या चर्चांमध्ये एकच नाव सध्या शहराच्या कानाकोपऱ्यात घुमत आहे ङ्गकोमलताई झंवरफ! आशिया खंडात नावाजलेली सामाजिक उपक्रमात अग्रेसर असलेली बुलढाणा अर्बन कॉ ऑप क्रेडीट सोसा लिमिटेड व सहकार विद्या मंदिराची यशस्वी अध्यक्षा, सहकार महर्षी राधेश्याम (उर्फ) भाईजी चांडक यांची कन्या आणि सातसमुद्र पार आपल्या कौशल्याने बँकेचे नाव नेणारे बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष सुकेश झंवर यांच्या सुविद्य पत्नी म्हणून परिचित असलेल्या कोमलताईंचा जनसंपर्क




आणि कार्यपद्धती अद्वितीय आहे. त्यांची शांत पण प्रभावी शैली, निर्णयक्षमता आणि सर्वसमावेशक विचारधारा हीच त्यांची खरी ताकद आहे. आई पुष्पाबाई चांडक यांच्या २००१ ते २००५ पर्यंतच्या कार्यकाळात बुलडाणा शहराचा विकासगंगा आणून शहराचा चेहरा मोहरा बदलणारे महिला नगराध्यक्षिका यांच्या कार्यकाळात झालेला विकास आजही बुलढाण्यात पावलोपावली जाणवतो. त्याच वारशाला नवी झळाळी देण्यासाठी कोमलताई झंवर सिद्ध होत असल्याचे शहरातील सुज्ञ नागरिक खुलेपणाने सांगू लागले आहेत.

कोमलताईंमध्ये नेतृत्वाची ताकद, लोकसंपर्काची खोली आणि विकासाची स्पष्ट दृष्टी आहे. बुलढाण्याच्या सर्व जाती, धर्म, समाजाला चालणारा असा एक चेहरा म्हणजे कोमल झंवर कोमलताईंनी निवडणूक लढवावी हा शहरातील जनतेचा सूर बनू लागला आहे. बुलढाण्याचा कायापलट घडविण्याची क्षमता, महिलांना पुढे नेण्याची प्रेरणा आणि सर्व समाजाच्या विकासाचा ध्यास घेणारे हे नेतृत्व लवकरच शहराच्या राजकारणात मोठी लाट निर्माणकरणारहेनक्की!

# बिहारी आखाडा!...

## संपादकीय लेख

मतदार याद्यांच्या सखोळ पडताळणी मोहिमेमुळे चर्चेत असलेल्या बिहारच्या विधानसभा निवडणुकीचा मुहूर्त अखेर जाहीर झाला आहे. जातीय समीकरणे, थेट लाभाच्या योजना, मतविभागणीचे डावपेच आणि प्रस्थापितांच्या विरोधातील असंतोष असे अनेक पैलू असलेल्या या निवडणुकीत कोणता घटक निर्णायक ठरणार, याचा कौल ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी मतदार करतील आणि १४ नोव्हेंबर रोजी तो सर्वांना कळेल. गेली वीस वर्षे वेगवेगळ्या आघाड्यांबरोबर सत्तासोबत करणारे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि त्यांना आव्हान देणारे नव्या पिढीचे शिलेदार तेजस्वी यादव हे यंदाच्या विधानसभा लढतीतील प्रमुख नायक; लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, जनसुराज्य पक्षाचे नेते प्रशांत किशोर, लोकजनशक्ती पक्षाचे चिराग पास्वान, उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्यासह कन्हय्या कुमार, जीतनराम मांझी असे अनेक नेते या लढतीची रंगत वाढवणार, अशी सध्याची स्थिती आहे. गेल्या निवडणुकीप्रमाणेच यंदाही बिहारमध्ये काँटे की टक्कर होणार, यावर निवडणूक पंडितांचे एकमत असले, तरी जन्मत:च राजकारणाचे बाळकडू घेऊन आलेला चाणाक्ष बिहारी मतदार यंदाही त्यांचे अंदाज चुकवणार का, याचीच उत्सुकता आहे. निवडणूक आयोगाने तारखांची घोषणा केल्यामुळे या लढाईला अधिकृत तोंड फुटले असले, तरी गेल्या काही महिन्यांपासूनच राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महागटबंधन यांच्यात खणाखणी सुरू झाली आहे. यामध्ये दोन्ही बाजूंकडून राजकारणाच्या चित्रात नवनवे रंग भरण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गेला काही काळ बिहारमध्ये जनतेचा मोठा पाठिंबा असलेल्या जातीय जनगणनेच्या मागणीला केंद्राने हिरवा कंदील दाखवला आहे. त्यानंतर बिहारमधील मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणीची निवडणूक आयोगाची मोहीम (एसआयआर) वादाच्या भोवऱ्यात सापडली. हा झगडा सर्वोच्च न्यायालयातही पोहोचला आहे. त्यात आधार कार्ड पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याचा आदेश न्यायालयाने दिला असला, तरी अंतिम निर्णय आलेला नाही. या मोहिमेत ४७ लाख मतदारांची नावे वगळली गेली. निवडणूक आयोगाच्या कारभाराच्या विरोधात राहुल गांधी यांनी व्होटचोरी चा आरोप करून बिहारमध्ये व्होटर अधिकार यात्रा काढली; तिला मोठा प्रतिसाद मिळाला. याचा मतदारांवर परिणाम होणार, असे वाटत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी महिलांना दहा हजार रुपये देण्याचा हुकमी एक्का बाहेर काढला आहे. बिहारच्या साडेसात कोटी मतदारांमध्ये ४६ टक्के महिला आहेत. त्यांपैकी एक कोटींहून अधिक महिलांनी या योजनेत अर्ज केले असून, बहुतांश महिलांच्या खात्यात रकमा जमाही झाल्या आहेत. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये सत्ताधाऱ्यांना हुकमी यश मिळवून देणारी ही ओवाळणी बिहारमध्येही एनडीए ला पुन्हा विजयाची माळ घालणार का, हे निकालानंतर कळेल. दुसरीकडे, अनेक जनमत चाचण्यांमध्ये तेजस्वी यादव यांनी मुख्यमंत्रिपदाचा सर्वांत लोकप्रिय चेहेरा म्हणून आघाडी घेतल्याचे दिसते; तसेच बेरोजगारीसारख्या मुद्द्यावरून ते सातत्याने रान उठवत आहेत. मुस्लिम आणि यादव यांचे एमवाय समीकरण, ही विरोधकांची जमेची बाजू असून, प्रस्थापितविरोधी मतांची त्यांना साथ मिळाल्यास सत्ताबदल होऊ शकतो, अशी त्यांना आशा आहे. मात्र, पूर्वीच्या जंगल राजच्या आरोपांमधून त्यांना सुटका करून घ्यावी लागणार आहे. त्याचप्रमाणे मुस्लिम आणि यादवांच्या मतपेढीत अतिपिछडे आणि दलितांच्या मतांचीही जोड देण्याचे आव्हान त्यांच्यापुढे आहे. याच जनमत चाचण्यांमध्ये नितीशकुमार यांना तिसऱ्या क्रमांकावर ढकलून दुसरे स्थान मिळवणारे पूर्वीचे निवडणूक पंडित आणि राहुल



यांच्यानंतरचे बिहारमधले दुसरे राजकीय यात्रेकरू प्रशांत किशोर यांनी दोन्ही आघाड्यांची झोप उडवली आहे. ते सत्ताधाऱ्यांना फटका देणार, की प्रस्थापित विरोधी मतांत वाटेकरी होणार, याबद्दल मतभिन्नता आहे; परंतु त्यांचा पाठिंबा मतांमध्ये रूपांतरित होणार का आणि किंगमेकर ठरण्याइतपत आमदार त्यांच्या गाठीशी असणार का, हासुद्धा प्रश्न अनुत्तरित आहे. नितीशकुमार यांनी बिहारमध्ये सुशासन बाबू म्हणून लौकिक मिळवला असला, तरी गेल्या काही काळात सरकारी पायाभूत सुविधांचे प्रकल्प वगळता औद्योगिक आघाडीवर आणि रोजगार निर्मितीमध्ये बिहारची पीछेहाटच झाली आहे. गेली दोन दशके १८० अंशाच्या कोनात विचारसरण्यांचे झोके घेऊन नितीशकुमार यांनी सत्ता कायम राखली खरी; पण गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या विचित्र वागण्यातून त्यांचे वाढते वय बोलू लागले आहे. त्यामुळेच सरकार कोणाचेही आले, तरी ही निवडणूक म्हणजे लालूप्रसाद यादव आणि नितीशकुमार यांच्या पिढीच्या राजकीय अस्ताची आणि तेजस्वी, चिराग, सम्राट चौधरी यांच्या पिढीच्या उदयाची ठरणार, हे मात्र स्पष्ट आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सांगलीचे दोन भाऊ गोव्याला गेले, मजा केली, पण परतताना भलताच 'उद्योग'

## कोल्हापूर हद्दीत येताच पोलिसांनी ठोकल्या बेड्या..



**कोल्हापूर :** सांगलीतून गोव्यात जाऊन मजामस्ती करून परत येताना बनावट दारूची तस्करी करत असलेल्या दोघा सख्ख्या चुलत भावांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने सापळा लावून अटक केली आहे. कोल्हापूर-राधानगरी रोडवरील नवीन वाशी नाक्याजवळ करण्यात आलेल्या या कारवाईत ५१ हजार ८४० रुपयांची गोवा बनावटीची विदेशी दारू, रेनॉल्ट डस्टर गाडी आणि अन्य साहित्य असा एकूण ७ लाख ५१ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात घेतला आहे.


४ ऑक्टोबर रोजी रात्री स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अमंलदार योगेश गोसावी यांना त्यांच्या बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गोवा बनावटीची विदेशी दारू रेनॉल्ट डस्टर कार (चक१० उअ८२११) मधून भोगावतीमार्गे कोल्हापूरच्या दिशेने येत आहे. महाराष्ट्र राज्यात अशा दारूच्या वाहतुकीवर व विक्रीवर बंदी असताना ती बेकायदेशीररीत्या आणली जात असल्याचे स्पष्ट झाल्यावर पोलिस निरीक्षक रवींद्र कळमकर यांनी उपनिरीक्षक संतोष गळवे यांच्या पथकाला कारवाईचे आदेश दिले. पथकाने रात्री नवीन वाशी नाक्याजवळ द स्पाइस हॉटेल समोर सापळा लावला. भरधाव आलेल्या कारला अडवून तपासणी केली असता, त्यात विदेशी कंपनीच्या गोवा बनावटीच्या १८० मिलीच्या बाटल्यांचे प्रत्येकी ६ बॉक्स, असे एकूण १२ बॉक्स सापडले.शुभम शिवकुमार साळुंखे (वय २८) आणि आशितोष हिंदुराव साळुंखे (वय २७, दोघे रा. आंधळी रोड, पलूस, जि. सांगली) अशी अटक केलेल्या दोघा भावांची नावे आहेत. हे दोघे सख्खे चुलत भाऊ आहेत. चौकशीत त्यांनी गोव्याला फिरायला गेल्यानंतर ही दारू पलूस परिसरातील बिअरबार चालकांना विकण्याचे नियोजन केल्याचे उघड झाले.

पहिल्याच प्रयत्नात त्यांचा गुन्हा पोलिसांच्या हाती लागला. यातील एका आरोपीचे वडील महसूल खात्यात वरिष्ठ अधिकारी असल्याची माहिती देखील पोलिसांनी दिली आहे.दरम्यान, संपूर्ण मिळालेला ५१,८४० रुपयांचा दारूसाठा, रेनॉल्ट डस्टर गाडी व इतर साहित्य असा ७,५१,८४० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. आरोपींविरुद्ध करवीर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, दारूसाठा कोठून व कोणासाठी आणण्यात येत होता याचा पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान गोवा सफरीतून परतताना बनावट विदेशी दारूची तस्करी करताना पोलिसांच्या जाळ्यात अडकलेल्या या दोन चुलत भावांवरील कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध दारू व्यवसायावर जरब बसली आहे.

# गावी येउन शेतात विवाहित प्रेमीयुगुलाने आयुष्य संपवलं





**नांदेड :** जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. वर्षभरापूर्वी पळून गेलेल्या एका विवाहित प्रेमीयुगुलाने गावी परतत विष प्राशन करून आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. हदगाव तालुक्यातील चिंचगव्हाण येथे सोमवारी ही घटना घडली. गजानन केरबा गव्हाळे (वय ३५) आणि उमा बालाजी कपाटे (वय २८) असं जीव दिलेल्या प्रेमीयुगुलाची नावं आहेत. या घटनेने हळहळ व्यक्त होतं असून दोघांची मुलं आई आणि वडिलांविना पोरकी झाली आहेत. घरी परतल्यानंतर कुटुंबाने या दोघांनाही स्वीकारण्यास नकार दिल्याने त्यांनी हे पाऊल उचलल्याचं सांगितलं जात आहे. हदगाव तालुक्यातील चिंचगव्हाण येथील गजानन केरबा गव्हाळे खाजगी वाहनांवर चालक म्हणून काम करायचा. त्याचं लग्न झालेलं असून पत्नीपासून तीन अपत्ये आहेत. वर्षभरापूर्वी गावातील विवाहित उमा बालाजी कपाटे हिच्यासोबत त्याचे प्रेमसंबंध जुळले. उमालाही तीन मुलं आहेत. एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या या दोघांनी आपल्या कुटुंबाचा काहीही विचार न करता पळून जाण्याचा निर्णय घेतला. दोघेही वर्षभरापूर्वी गावातून पळून गेले.जवळपास वर्षभर बाहेर गावी राहिल्यानंतर ५ ऑक्टोबर रोजी उमा आणि गजानन हे दोघे चिंचगव्हाण गावात परत आले. परंतु, दोघांनाही त्यांच्या घरच्यांनी विरोध केला आणि त्यांना घरात येऊ दिलं नाही. त्यानंतर या प्रेमीयुगुलाने गावालगत असलेल्या शेतात जाऊन विष प्राशन केले आणि आपल्या आयुष्याची अखेर करण्याचा प्रयत्न केलाया घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी दोघांना उपचारासाठी हदगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथुन त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, सोमवारी दोघांचाही उपचारा दरम्यान मुत्यू झाल्याची माहिती आहे. या घटनेमुळे चिंचगव्हाण गावावर शोककळा पसरली आहे. या प्रकरणी मनाठा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेनंतर उमा आणि गजानन या दोघांची मुले आई आणि वडिलांविना पोरकी झाली आहेत.

# पूजा करून निघालेल्या इसमाची वाटेतच हत्या





**नाशिक :** नाशिकच्या जयभवानी रोड येथील चव्हाण मळा येथे आज पहाटे ५ वाजेच्या सुमारास अमोल मेश्राम (वय ४६) या व्यक्तीची हत्या करण्यात आली. पहाटेच्या सुमारास मंदिरात पूजेसाठी गेल्यानंतर अमोल यांची हत्या करण्यात आल्याने शहरात खळबळ उडाली होती. अखेर घटना घडल्यानंतर अवघ्या काही तासांतच नाशिक पोलिसांकडून घटनेतील दोन संशयतांना ताब्यात घेण्यात आलं आहे. अमल शर्मा, कुणाल सौदे असे अटक केलेल्या संशयितांची नावे असून प्रॉपर्टीच्या वादातून ही हत्या केल्याची कबुली ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांनी पोलिसांना दिली आहे.संशयित कुणाल सौदे आणि मयत अमोल मेश्राम यांच्यामध्ये प्रॉपर्टीचा वाद सुरू होता. त्या वादातूनच ही हत्या केल्याची कबुली ताब्यात घेण्यात आलेल्या दोन संशयितांकडून पोलिसांना देण्यात आली आहे. याबाबत उपनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून उपनगर पोलिस अधिक तपास करत आहे.अमोल मेश्राम हे दररोज पहाटे परिसरातील मंदिरात पूजेसाठी जात असत. तसंच सेवेकरी म्हणून देखील अमोल मेश्राम हे मंदिरात जात होते. आज नेहमीप्रमाणे ते त्यांच्या जय भवानी रोड येथील साबरमती सोसायटी येथे पहाटे ५ वाजेच्या सुमारास परिसरातील मंदिरातून पूजापाठ करून घरी परतत असताना दोन जणांनी अमोल यांच्यावर कोयत्याने वार केले. मुलगा अजून घरी का परतला नाही, हे पाहण्यासाठी गेलेल्या अमोल यांच्या आईला आपला मुलगा रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी तत्काळ अमोल याला रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

दरम्यान, या घटनेनं परिसरात भीतीचं वातावरण पसरलं. घटनेची माहिती मिळताच उपनगर पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. नाशिक शहरात वाढत्या गुन्हेगारीने नाशिककर नागरिक भयभीत झाले असून दिवसाआड खून, खुनाचा प्रयत्न, हाणामाऱ्या, तोडफोड अशा घटना समोर येत आहेत. रात्रीच्या वेळी नाशिककर नागरिक बाहेर पडण्यास घाबरत आहे.

## जाचामूळे आत्महत्या

**सांगली :** इश्वरपूर येथे अमृता गुरव हिने सासरच्या जाचामुळे आयुष्याची अखेर केली. सासूच्या औषधोपचारासाठी माहेरुन दोन लाख रुपये आणण्यासाठी अमृता गुरव हिचा छळ होत असल्याचा आरोप आहे. वारंवार होणाऱ्या त्रासाला कंटाळून तिने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची माहिती आहे. इश्वरपूर येथे राहणारा अमृताचा पती ऋषिकेश, सासू सासरे आणि नणंद यांच्यावर इश्वरपूर पो.ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.एक वर्षापूर्वी कुटुंबियांच्या विरोधाला न जुमानता अमृताने ऋषभसोबत प्रेमविवाह केला होता.

## गर्लफ्रेंडच्या लग्नाने संतापलेल्या तरुणाचं भयंकर कृत्य

**लखनऊ :** प्रेयसीचं दुसऱ्या कोणाशी लग्न होणार होते. यामुळे नाराज झालेल्या एका व्यक्तीने तिच्या काकाची हत्या केली आहे. उत्तर प्रदेशातील अमेठी येथून ही धक्कादायक घटना समोर आली आहे. ३ सप्टेंबर रोजी ही घटना घडली असून यानंतर पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचा आरोप कुटुंबाने केला आहे. पोलिसांनी याला अपघात असल्याचं सांगितलं, असाही आरोप कुटुंबाने केला आहे.

ही घटना अमेठी जिल्ह्यातील अमेठी कोतवाली परिसरातील भगवानपूर गावात घडल्याची माहिती आहे. गावातील रहिवासी विमल कुमार मर्चंट नेव्हीमध्ये अबुधाबी येथे तैनात होता. गेल्या काही महिन्यांपासून त्याच्या मोठ्या भावाच्या मुलीचे संग्रामपूर पोलिस स्टेशन परिसरातील तारापूर गावातील एका मुलाशी प्रेमसंबंध होते. विमल याच्या विरोधात होता.

सामाजिक प्रतिष्ठेसाठी त्यांनी आपल्या भाचीचे लग्न मुसाफिरखाना येथील एका व्यक्तीशी लावून दिले. पण, प्रियकराने त्या मुलीच्या पतीचा फोन नंबर मिळवला आणि व्हॉट्सॲपवर त्याला आणि त्याच्या प्रेयसीच्या काकाला जीवे मारण्याची धमकी देऊ लागला होता.

# शरद पवारांवर मनोज जरांगेंची टीका; राष्ट्रवादी म्हणते, 'आता तुम्हाला महायुतीची स्क्रिप्ट आली का?'





**पुणे :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) नेते शरद पवार यांच्यावर थेट टीका केली आहे. आतापर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मनोज जरांगे यांच्या निशाण्यावर होते. मात्र मुंबईचं आंदोलन संपल्यानंतर जरांगे यांचा सूर बदलला असून त्यांनी आपल्या टीकेचा मोर्चा फडणवीसांकडून थेट शरद पवारांकडे वळवला आहे. शरद पवारांनीच मराठ्यांचं वाटोळं केलं, असं म्हणत जरांगे यांनी शरद पवार यांना लक्ष्य केलं आहे.मनोज जरांगे यांच्या टीकेनंतर आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. सामाजिक कार्यकर्त्यांना महायुतीची स्क्रिप्ट आली आहे का? असा थेट सवाल राष्ट्रवादीचे पुणे शराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी मनोज जरांगे यांना विचारला आहे. 'सध्या महाराष्ट्रमध्ये जाती-धर्माचं राजकारण मोठ्या प्रमाणात चालू आहे. लोकसभा, विधानसभा आणि आता येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका असतील, यामध्ये महायुती किंवा महायुतीला मदत करणारे छुपे घटक हे महाराष्ट्रमध्ये जाती धर्मांचं राजकारण किंवा आरक्षणाची लढाई ही कशी चिघळेल यासाठी प्रयत्नशील आहेत. अशात जे शरद पवार १९९५ सालापासून कोणत्याही घटनात्मक पदावर नाहीत, १९९९ पासून पवार यांच्या पक्षाकडे मुख्यमंत्र्यासारखं घटनात्मक पद नाही. त्या पवारांवर टीका केल्याशिवाय राज्यातील मुख्यमंत्री, आमदार, खासदार आणि मंत्र्यांना झोप येत नाही. राज्यातल्या सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तर चढाओढ लागली आहे, कधी लक्ष्मण हाके हे टीका करतात तर आता मनोज जरांगे पाटील यांनी देखील टीका केली आहे,' असं जगताप म्हणाले आहेत.मुळात कोणत्याही सामाजिक कार्यकर्त्यांच्या सर्टिफिकेटची गरज शरद पवार यांना नाही. पवार यांनी मागची ६८ वर्ष या महाराष्ट्रात सामाजिक कार्य उभा केलं आहे. अशा टीकांना आम्ही फार महत्व देत नाही. होय शरद पवार यांनी मंडल कमिशन लागू करून सर्व जाती घटकांना समान संधी उपलब्ध करून दिल्या. कधीकधी शंका येते महायुती सरकार प्रत्येकालाच काहीतरी स्क्रिप्ट पाठवतं का? त्यामुळे जे पवार ३० वर्षांपासून कोणत्याही घटनात्मक पदावर नाही. त्यांच्यावर टीका केल्याने महाराष्ट्र तुमच्याकडे पाहील का, याचा विचार करा. देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री यांना प्रश्न विचारण्यापेक्षा पवार यांवर टीका करण्याचा धंदा तुम्ही आता बंद करा,' अशी घणाघाती टीका प्रशांत जगताप यांनी मनोज जरांगे यांच्यावर केली आहे.१९९४ साली शरद पवारांनी आमच्या हक्काचं १६ टक्के आरक्षण ओबीसींना दिलं आणि आमचं वाटोळं केलं. ओबीसी समाजाला १९९४ साली देण्यात आलेलं आरक्षण हे मराठ्यांच्या हक्काचं होतं. आमचं १६ टक्के आरक्षण आम्हाला मिळणार आहे. पण ज्यांनी ओबीसींना आरक्षण

## भाजपच्या मनसुब्यांना सुरुंग लावणारा शिंदेंचा प्रस्ताव

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकांना भारतीय जनता पक्ष, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस महायुती म्हणून सामोरे जाणार असल्याची चर्चा आहे. तिन्ही पक्ष एकत्रित लढताना जागावाटपावरुन मोठी रस्सीखेच पाहायला मिळण्याची शक्यता आहे. शिवसेनेची मोर्चेबांधणी सुरु केली असून भाजपकडे पहिला प्रस्ताव मांडला जाण्याचे संकेत मिळत आहेत.मुंबई महापालिकेत २२७ जागा असून शहरात शिवसेना आणि भाजप यांचं प्राबल्य आहे. त्यामुळे मुंबईत अजित पवारांची राष्ट्रवादी अधिक जागांचा आग्रह धरण्याची शक्यता कमी आहे. किंबहुना राष्ट्रवादी आपापल्या पॉकिट्समध्ये स्वबळावर लढण्याची शक्यताही नाकारता येत नाही. भाजपला कुठल्याही परिस्थितीत स्वतःचा महापौर मुंबईवर बसवायचा आहे. त्यासाठी निम्म्याहून अधिक जागा जिंकण्याची गरज आहे. त्यासाठी निम्म्याहून कैक जास्त जागा लढवाव्या लागतील.

## निवडणूक राज्यात, तिकीट वाटपाची चर्चा दिल्लीत, भाजपचा 'केजे' फॉर्म्युला ठरला, काय आहेत निकष?

**कोल्हापूर :** बिहार विधानसभा निवडणुकीची तुतारी सोमवारी वाजल्यावर सत्तारूढ एनडीए व विरोधी पक्षांची महाआघाडी यांच्या प्रस्तावित तिकीट वाटपाच्या चर्चेला दिल्लीत उधाण आले आहे. बेरोजगारी आणि भ्रष्टाचार हे सर्वात मोठे मुद्दे राहणार असणाऱ्या या निवडणुकीत भाजपने तिकीट वाटपासाठी जातीय समीकरणांच्या जोडीलाच कामगिरी व जनसमर्थन असा 'केजे' फॉर्म्युला तयार केला आहे.नितीशकुमार यांचा जदयु, तेजस्वी यादव यांचा राष्ट्रीय जनता पक्ष, काँग्रेस, डावे आदी पक्षही तिकीट वाटपात याच बाबींना महत्व देतील असे संकेत राजकीय वर्तुळातून मिळत आहेत.



मुख्यमंत्री नितीशकुमार यांनीही तरुण चेहऱ्यांना व महिलांना जदयुच्या तिकीट वाटपात झुकते माप मिळेल असे जाहीर केले आहे. तेजस्वी यांनी निवडणुकीची घोषणा होताच, हर बिहारी मुख्यमंत्री असा भावनिक नारा सोमवारी दिला. बेरोजगारी, कायदा सुव्यवस्था स्थिती व भ्रष्टाचार त्यांचा पक्ष प्रचारात भर देत आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार यांचे आरोग्य सुस्थितीत नसून राज्याला नव्या चेहऱ्याची गरज असल्याची टीका त्यांनी केली आहे.लालूप्रसाद यांच्यापासून राजदमध्ये बस्तान बसवलेल्या अनेक ज्येष्ठ नेत्यांना यंदा तिकीट नाकारले जाऊ शकते. त्यांच्याऐवजी तरुण चेहऱ्यांना तेजस्वी यांच्या टीममध्ये स्थान मिळू शकते. राजदकडून मिळतील तेवढ्या जागांवर काँग्रेसला समाधान मानावे लागणार असून हा पक्षही तरुण चेहऱ्यांवर डाव लावेल अशी चिन्हे आहे. काँग्रेसची उमेदवार यादी सर्वांत अखेरीस व मध्यरात्री जाहीर होते हा पूर्वानुभव आहे.भाजप सूत्रांच्या माहितीनुसार पक्षाने आपल्या आमदारांची कामगिरी आणि जनतेच्या पाठिंब्याबाबतचा सविस्तर सर्वेक्षण अहवाल तयार केला आहे. भाजपच्या काही मतदारसंघांमध्ये आमदारांची कामगिरी खराब आहे आणि जनता त्यांच्यावर नाराज आहे. या मतदारसंघांमध्ये भाजप ज्या नेत्याला जनतेचा पाठिंबा आहे त्याला प्राधान्य देईल. संभाव्य उमेदवारांच्या नावांवर चर्चा करण्यासाठी बिहार भाजपने शनिवार आणि रविवारी बैठक घेतली. या बैठकीत अंतिम झालेली नावे बिहार भाजपकडून केंद्र सरकारला पाठवली जातील आणि त्यानंतर भाजपचे संसदीय मंडळ उमेदवारांची अंतिम नावे निश्चित करेल. जिथे सत्ताविरोधी लाट आहे, तिथे नवीन उमेदवार उभा केला जाईल व यावेळी भाजपच्या उमेदवार यादीत अधिक नवीन चेहरे आणि तरुणांचा समावेश असू शकतो. यावेळीही अनेक नवीन उमेदवारांची नावे यादीत येतील असेही भाजप सूत्रांनी सांगितले.


## शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हावर अंतिम सुनावणी

**मुंबई :** शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाबाबत महत्त्वाची अपडेट समोर येत आहे. सुप्रीम कोर्टात या प्रकरणात गेल्या अनेक महिन्यांपासून सुनावणी सुरु आहे. या प्रकरणाची सुनावणी आता अंतिम टप्प्यावर आली आहे. सुप्रीम कोर्टात या प्रकरणी उद्या अंतिम सुनावणी होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हावर निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासाठी ही शेवटची आशा आहे. निकाल त्यांच्या बाजूने लागला तर महाराष्ट्राचं राजकारण ढवळून निघणार आहे. राज्याच्या राजकारणावर त्याचे अमूलाग्र असे बदल पडणार आहेत. यामुळे या सुनावणीकडे आणि त्याच्या निकालाकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची सुप्रीम कोर्टात बाजू मांडणारे वकील असीम सरोदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'धनुष्यबाण हे पक्षचिन्ह मूळ शिवसेनेचं आहे. ते हिरावण्यात आलं आहे.

## रामदास भाईकडून भाजपच्या मेहनतीवर पाणी; ठाकरेंना थेट फुलटॉस







**मुंबई :** बाळासाहेब ठाकरेंचं पार्थिव उद्धव ठाकरेंनी २ दिवस घरात ठेवलं होतं. त्यांच्या हातांचे ठसे घेतले. त्या ठशांचं काय झालं, असा सवाल करत शिंदेसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी दसरा मेळाव्यातून त्यांच्या आधीच्या पक्षप्रमुखांवर शरसंधान साधलं. कदम यांनी केलेल्या आरोपांच्या टायमिंगवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. कदम यांचे आरोप शिंदेसेनेसह भाजपलादेखील महागात पडण्याची शक्यता आहे.उद्धव ठाकरेंवर रामदास कदम यांनी केलेल्या आरोपांमुळे शिंदेसेनेच्या नैतिकतेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. बाळासाहेब ठाकरेंचं निधन २०१२ मध्ये झालं. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी त्यांच्या पार्थिवाचे हाल केले, असा आरोप कदम यांनी २ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या दसरा मेळाव्यात केला. कदम यांनी या गोष्टी १३ वर्षांनी अचानक कशा आठवल्या? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मागील १३ वर्षे कदम शांत का होते, हा सवाल महत्त्वाचा आहे.२०१४ मध्ये राज्यात भाजपचं सरकार आलं. तेव्हा एकसंध असलेली ठाकरेंची शिवसेना काही महिन्यांनंतर भाजप सोबत सत्तेत सहभागी झाली. तेव्हा एकनाथ शिंदे , रामदास कदम, गुलाबराव देवकर यांच्यासह अनेक जण मंत्री झाले. तेव्हाच्या फडणवीस सरकारमधील शिवसेनेचे बहुतांश मंत्री आता शिंदेंसोबत होते. या सगळ्यांची निष्ठा बाळासाहेबांच्या चरणी होती, असं ही नेतेमंडळी सांगतात. मग बाळासाहेबांच्या पार्थिवाचे हाल सुरु असताना या नेत्यांनी चकार शब्द का काढला नाही, हा प्रश्न निर्माण होतो. मंत्रीपदं मिळाली म्हणून बाळासाहेबांच्या पार्थिवाचे हाल १३ वर्षे आठवले नाही का, हादेखील सवाल आहे.

### शिंदेसेना डॅमेज, भाजपचंही नुकसान

रामदास कदम यांच्या आरोपांमुळे भाजपचंही नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपसह महायुतीची दैना झाली. महायुतीला ४८ पैकी ३१ जागा मिळाल्या. भाजपला २८ जागा लढवून केवळ ९ जागांवर समाधान मानावं लागलं. त्यामुळे विधानसभा निवडणूक आव्हानात्मक वाटू लागलीलोकसभा निवडणुकीत महायुतीची पिछेहाट झाल्यावर तत्कालीन उपमुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी 'व्होट जिहाद'चा मुद्दा काढला. त्यासाठी धुळे लोकसभा मतदारसंघातील मालेगाव विधानसभेचं उदाहरण देण्यात आलं. महाविकास आघाडीचा उमेदवार सहापैकी पाच विधानसभा मतदारसंघात पिछाडीवर होता. पण मध्य मालेगाव विधानसभा मतदारसंघातील आघाडीमुळे काँग्रेसचा उमेदवार जिंकला. केवळ अल्पसंख्याक मतदारांच्या एकगठ्ठा मतदानामुळे भाजपचा उमेदवार जिंकला हे फडणवीसांनी आकडेवारीसह ठासून सांगितलं. ३० सप्टेंबर २०२४ रोजी फडणवीस यांनी 'व्होट जिहाद' मुद्दा प्रभावी मांडला. त्याला आता वर्ष लोटलं आहे. रामदास कदमांनी ज्या दिवशी बाळासाहेबांच्या पार्थिवाचा मुद्दा काढला, त्या दिवशी 'व्होट जिहाद'च्या मुद्द्याला ३६८ दिवस होऊन गेले होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# इंग्लंडचा बांगला देशवर चार गडी राखून दणदणीत विजय

**गुवाहाटी :** महिलांच्या विश्वचषक क्रिकेट सामन्यात इंग्लंडने बांगला देशचा चार गडी राखून पराभव केला. इंग्लंडच्या शिस्तबद्ध गोलंदाजीच्या जोरावर त्यांनी बांगला देशला १७८ धावांवर रोखले आणि नंतर हे लक्ष्य ४६.१ षटकांत ६ गडी गमावून १८२ धावा करत पूर्ण केले. कर्णधार हेदर नाईट हिने ७९ धावांची नाबाद खेळी साकारत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.

प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या बांगला देशची ५९ धावांत ३ गडी अशी बिकट अवस्था झाली होती. मात्र, शोभना मोस्टारी हिने १०८ चेंडूमध्ये संयमी ६० धावांची खेळी करत एक बाजू सावरली. तरीही, दुर्सया बाजूने नियमित अंतराने बळी पडत राहिले. शेवटच्या फळीतील राबिया खान हिने २७ चेंडूमध्ये एक षटकार आणि सहा चौकारांच्या मदतीने झटपट ४३ धावांची खेळी करून संघाच्या धावसंख्येला काहीशी प्रतिष्ठा मिळवून दिली. इंग्लंडकडून सोफी एक्लेस्टोन हिने सर्वाधिक ३ बळी (२४ धावांत) घेतले, तर चार्ली डीन (२/२८), लिन्सी स्मिथ (२/३३), लॉरेन बेल (१/२८) आणि लिस कॅप्सी (२/३१) यांनीही बळी मिळवत तिला चांगली साथ दिली. बांगला देशकडून फाहिमा खातून हिने १६ धावांत ३ बळी घेत उत्कृष्ट गोलंदाजी केली.

श्रीलंकेच्या संघाने अजून एकही विजय मिळवलेला नाही. पण ऑस्ट्रेलिया विरुद्धचा सामना पावसामुळे रद्द झाल्यामुळे त्यांच्या खात्यात १ गुण जमा झाला आहे. न्यूझीलंड आणि पाकिस्तानचा संघ गुणतालिकेत तळाला आहे. दोन्ही संघांनी आपापले पहिले दोन्ही सामने गमावले आहेत. ते अजूनही पहिल्या विजयाच्या प्रतिक्षेत आहेत.




## बांगलादेशला पराभूत करत टीम इंडियाला दिला दणका

महिला वनडे वर्ल्ड कप स्पर्धेत भारतीय संघाने श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्या विरुद्धच्या सलग दोन विजयासह ४ गुण कमावत गुणतालिकेत अव्वलस्थान पटकावले होते. इंग्लंडच्या संघाने बांगलादेशविरुद्धच्या सामन्यातील सलग दुसऱ्या विजयासह ४ गुण आपल्या खात्यात जमा केले आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या आणि मोठ्या विजयासह इंग्लंडनं उत्तम नेट रनरेटच्या जोरावर भारतीय संघाला अव्वलस्थानावरुन खाली खेचत नंबर वनर कब्जा केला आहे. ऑस्ट्रेलियन संघ २ सामन्यानंतर १ विजय आणि एका अनिर्णित सामन्यासह ३ गुण मिळवून या यादीत तिसऱ्या स्थानावर तर बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिकेचा संघ प्रत्येकी २-२ गुणांसह टॉप ५ मध्ये आहे.

## आनंद-कास्पारोव्ह ३० वर्षांनंतर पुन्हा आमने-सामने भिडणार!

**सेंट लुईस :** माजी विश्वविजेते विश्वनाथन आनंद आणि गॅरी कास्पारोव्ह यांची एकेकाळची कट्टर बुद्धिबळ स्पर्धा ३० वर्षांनंतर पुन्हा एकदा पाहायला मिळणार आहे. या दोन दिग्गजांमध्ये 'क्लच चेस: द लेजेंड्स' या स्पर्धेत बुधवारी सामना होणार आहे. तीन दिवसांच्या या सामन्यात दररोज चार गेम खेळले जातील. यात २ रॅपिड आणि २ ब्लिट्झ गेम्सचा समावेश असेल.


सेंट लुईस चेस क्लबच्या अद्ययावत सेंटरमध्ये ही १२ डावांची चेस ९६० सामन्यांची मालिका खेळली जाणार आहे. यासाठी एकूण (१ लाख ४४ हजार अमेरिकन डॉलर) इतकी बक्षिसाची रक्कम ठेवण्यात आली आहे. १९९५ मध्ये न्यूयॉर्क येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या १०७ व्या मजल्यावर 'क्लासिकल वर्ल्ड चॅम्पियनशिप'मध्ये हे दोन खेळाडू आमने-सामने आले होते. आता हे दोन दिग्गज पुन्हा एकदा रॅपिड आणि ब्लिट्झ या प्रसिद्ध प्रकारात लढणार आहेत.

कास्पारोव्हने २००४ मध्ये निवृत्ती घेतल्यानंतर केवळ प्रदर्शनी किंवा ब्लिट्झ स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे, तर आनंदने सेमी रिटायरमेंट घेतली असून, तो अधूनमधून छोट्या-मोठ्या स्पर्धांमध्ये खेळतो. कास्पारोव्ह जगभर प्रशिक्षण कार्यक्रम चालवतो, तर आनंदने स्वतःला तरुण भारतीय खेळाडूंना मार्गदर्शन करण्यापुरते मर्यादित ठेवले आहे. डब्ल्यूएसीए या संस्थेच्या स्थापनेमागे त्याची प्रेरणा असून, याच संस्थेने डी. गुकेशच्या रूपात भारताला एक विश्वविजेता दिला आहे, हे येथे उल्लेखनीय आहे.

## कांस्यपदक विजेता अमन सेहरावतवर एका वर्षाची बंदी

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या अमन सेहरावतला जागतिक वरिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेत वजन गटात अपयशी ठरल्याबद्दल भारतीय कुस्ती महासंघाने मंगळवारी एक वर्षासाठी निलंबित केले आहे. पुरुषांच्या ५७ किलो फ्रीस्टाईल गटातील भारताच्या पदकाचा दावेदार असलेल्या २२ वर्षीय अमनला स्पर्धेच्या दिवशी निर्धारित वजनाच्या मर्यादेपेक्षा १.७ किलो जास्त वजन असल्याने अपात्र ठरवण्यात आले होते. यावरून ही कारवाई करण्यात आली. निलंबनाच्या या कालावधीत, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर डब्ल्यूएफआयने आयोजित केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होण्यास अथवा त्याशी संलग्न राहण्यास सक्त मनाई आहे, असे डब्ल्यूएफआयने नमूद केले आहे.

२३ सप्टेंबर २०२५ रोजीच्या पत्राद्वारे डब्ल्यूएफआयने अमनला या चुकीबद्दल स्पष्टीकरण मागण्यासाठी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. महासंघाने सांगितले की, २९ सप्टेंबरला त्याने सादर केलेले उत्तर त्यांच्या शिस्तपालन समितीला 'असमाधानकारक' आढळले. आपले २९ सप्टेंबर २०२५ रोजीचे उत्तर शिस्तपालन समितीने योग्यरीत्या तपासले. तसेच, मुख्य प्रशिक्षक आणि सहायक प्रशिक्षक कर्मचार्यांकडूनही स्पष्टीकरणे घेण्यात आली. सखोल तपासणीअंती, समितीला आपले उत्तर असमाधानकारक आढळले असून, कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे त्यात म्हटले आहे.



दरम्यान, मुख्य प्रशिक्षक जगमेंदर सिंग आणि इतर तीन प्रशिक्षक सदस्य विनोद, वीरेंद्र आणि नरेंद्र- यांनाही अजिंक्यपद स्पर्धेच्या तयारीदरम्यान वजन व्यवस्थापनावर लक्ष ठेवण्यात अपयश का आले, याबद्दल स्पष्टीकरण देण्यास सांगण्यात आले होते.

## भारताविरुद्धच्या वनडे-टी२० मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाच्या संघाची घोषणा

**नवी दिल्ली :** भारताविरुद्धच्या एकदिवसीय आणि टी-२० मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाच्या संघाची निवड करण्यात आली आहे. मिचेल मार्श एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व करणार आहे. नियमित कर्णधार पॅट कमिन्स दुखापतीमुळे या मालिकेचा भाग असणार नाही, याशिवाय ग्लेन मॅक्सवेल याचाही समावेश कोणत्याच संघात करण्यात आलेला नाही.

एकदिवसीय संघात मिचेल स्टार्कचे पुनरागमन झाले आहे. अनुभवी मार्नस लाबुशेनला डच्चू देण्यात आला आहे. तर अनकॅप्ड खेळाडू मॅथ्यू रेनशॉ याला वनडे संघातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पणाची संधी मिळाली आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना १९ ऑक्टोबर रोजी पर्थ येथे होणार आहे, तर दुसरा एकदिवसीय सामना २३ ऑक्टोबर रोजी ॲडलेड येथे आणि तिसरा एकदिवसीय सामना २५ ऑक्टोबर रोजी सिडनी येथे खेळला जाईल.

स्टार्कने नुकताच टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती, पण त्याची एकदिवसीय संघात वापसी झाली आहे. त्याने अखेरचा एकदिवसीय सामना नोव्हेंबर २०२४ मध्ये खेळला होता, त्यानंतर तो वर्कलोड मॅनेजमेंटमुळे विश्रांतीवर होता. १५ सदस्यीय एकदिवसीय संघात चार बदल करण्यात आले आहेत. रेनशॉ, मॅट शॉर्ट आणि मिच ओवेन यांचा संघात समावेश करण्यात आला आहे. ओवेन आणि शॉर्ट दोघांचीही निवड दक्षिण आफ्रिका मालिकेसाठी झाली होती, परंतु दुखापतीमुळे ते खेळू शकले नव्हते. आता हे दोन्ही खेळाडू भारताविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यास सज्ज आहेत.




### ऑस्ट्रेलियाचा टी-२० आंतरराष्ट्रीय संघ

मिचेल मार्श (कर्णधार), सीन ॲबॉट, झेवियर बार्टलेट, टिम डेव्हिड, बेन ड्वार्शुइस, नाथन एलिस, जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मॅथ्यू कुहनेमन, मिचेल ओवेन, मॅथ्यू शॉर्ट, मार्कस स्टोइनिस, ॲडम झम्पा.

### ऑस्ट्रेलियाचा वनडे संघ

मिचेल मार्श (कर्णधार), झेवियर बार्टलेट, ॲलेक्स कॅरी, कूपर कोनोली, बेन ड्वार्शुइस, नाथन एलिस, कॅमरन ग्रीन, जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मिचेल ओवेन, मॅथ्यू रेनशॉ, मॅथ्यू शॉर्ट, मिचेल स्टार्क, ॲडम झम्पा.

# मातृभाषा मराठीच पण विचार उर्दूतूनच करतो..

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक सचिन पिळगावकर नेहमीच त्यांच्या बहुगुणी व्यक्तिमत्वामुळे चर्चेत असतात. नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत त्यांनी उर्दू भाषेबद्दलचं आपलं प्रेम व्यक्त करताना केलेलं विधान सोशल मीडियावर चांगलंच चर्चेचा विषय बनला आहे.

सचिन पिळगावकर हे त्यांच्या स्पष्ट आणि विचारपूर्ण वक्तव्यांमुळे अनेकदा चर्चेत राहतात. त्यांच्या मतांवरून त्यांना कधी कौतुक तर कधी ट्रोलिंगलाही सामोरं जावं लागतं. नुकतेच ते 'बहार-ए-उर्दू' या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या विशेष सोहळ्यात सचिन पिळगावकर यांच्यासोबत अभिनेते शेखर सुमन आणि इतर मान्यवरही उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान बोलताना सचिन यांनी आपल्या भाषेवरील प्रेम व्यक्त केलं.

ते म्हणाले - ङमाझी मातृभाषा मराठी असली तरी मी विचार उर्दूत करतो. त्यांच्या या मनमोकळ्या कबुलीने उपस्थित प्रेक्षकांना भारावून टाकलं. पण दुसरीकडे मात्र सोशल मीडियावर त्यांच्या या वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू झाली.

### कार्यक्रमात काय म्हणाले पिळगावकर?

सचिन पिळगावकर म्हणाले- ''माझी मातृभाषा मराठी आहे पण मी विचार उर्दू भाषेतून करतो. मला माझ्या बायकोने किंवा कोणीही रात्री ३ वाजता उठवलं तरी मी उर्दू बोलून जागा होतो. मी केवळ उर्दूतून जागा होत नाही तर मी उर्दूसोबत झोपतोही. माझं उर्दू भाषेवरील प्रेम माझ्या बायकोला आवडतं.'' त्यांच्या या वक्तव्यानंतर उपस्थितांनी दाद दिली. पण शेखर सुमन यांनीही खास दाद दिली.

सचिन पिळगावकर यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मराठी तसेच हिंदी चित्रपटांत काम केलं आहे. चित्रपटसृष्टीतला बालकलाकार पासून सुरू झालेला त्यांचा प्रवास अद्यापही कायम आहे. अभिनय, संवाद फेक आणि भाषेवरील पकड ही नेहमीच प्रेक्षकांना रुंजी घालणारी ठरलीय. त्यामुळेच उर्दू भाषेवरील त्यांचं प्रेम त्यांनी प्रांजळपणे व्यक्त केलं आहे.

**सोशल मीडियावर ट्रोल..**

उर्दू भाषेचे गोडवे गायले, त्यामुळे अनेकांना त्यांचे हे वक्तव्य पचलेलं नाही. काही नेटकऱ्यांनी त्यांनी ट्रोल करण्यास सुरुवात केली. मीडिया एका सोशल युजरने म्हटलं की, मराठीत असे कलाकार असतील तर काय उपयोग? मराठी चित्रपटसृष्टीचे हे हाल आहेत. तर आणखी एकाने लिहिले- तुमच्या काही लक्षात राहत नाहीये का? तुम्ही खरंच म्हातारे झाले का? तर दुसऱ्या नेटकऱ्याने त्यांना त्यांचे बोलणे कुणीतरी आवरा, असे म्हटले आहे. काही नेटकऱ्यांना त्यांचे हे विधान फारसं पसंत पडलेलं दिसत नाही.



## रजनीकांत बद्रीनाथ धामच्या दर्शनाला




**बद्रीनाथ धाम :** सुपरस्टार रजनीकांत शुक्रवारी दुपारी हेलिकॉप्टरने श्री बद्रीनाथ धाम येथे पोहोचले. त्यांनी दुपारी १:३० वाजता श्री बद्रीनाथ मंदिरात दर्शन घेतले आणि प्रार्थना केली. बद्रीनाथ धाम येथे पोहोचल्यानंतर, बद्रीनाथ मंदिराचे प्रभारी अधिकारी, कार्यकारी अभियंता अनिल ध्यानी यांनी सुपरस्टार रजनीकांत यांना भगवान बद्री विशालचा प्रसाद भेट दिला. त्यांनी सांगितले की रजनीकांत आज बद्रीनाथ धाम येथे मुक्काम करत आहेत.

सुपरस्टार रजनीकांत म्हणाले की ते दरवर्षी आंतरिक शांती आणि आध्यात्मिक अनुभवासाठी केदारनाथ आणि बद्रीनाथ धामला भेट देतात. यावेळी बद्रीनाथ येथे रावल ईश्वर प्रसाद नंबूद्री, धर्माधिकारी राधाकृष्ण थापलियाल, ज्योतिर्मठ प्रभारी ब्रह्मचारी मुकुदानंद, वेदपथी रवींद्र भट्ट, कार्यकारी अधिकारी बद्रीनाथ नगर पंचायत सुनील पुरोहित, लक्ष्मी मंदिराचे पुजारी दिनेश डिमरी, पोलिस स्टेशन प्रमुख नवनीत भंडारी, हरेंद्र कोठारी, हरीश जोशी, विकास संवल आणि इतर उपस्थित होते.

## कांताराला राष्ट्रपती भवनात स्क्रीनिंगचा सन्मान

**नवी दिल्ली :** साऊथ फिल्म इंडस्ट्रीचा दरारा दिवसेंदिवस वाढत चालला आहे आणि याचं एक भक्कम उदाहरण म्हणजे 'कांतारा चैप्टर १'. ऋषभ शेट्टीच्या या बहुचर्चित चित्रपटाने जगभरात प्रेक्षकांची मनं जिंकत चौथ्याच दिवशी २५० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाची स्क्रीनिंग नुकतीच राष्ट्रपती भवनात आयोजित करण्यात आली होती, जे कोणत्याही चित्रपटासाठी अत्युच्च सन्मान मानला जातो. राष्ट्रपती भवनात झालेल्या या खास स्क्रीनिंगला चित्रपटाचे निर्माता आणि मुख्य अभिनेत्री रुक्मिणी वसंतही उपस्थित होत्या. 'कांतारा'ला यापूर्वीही प्रचंड लोकप्रियता मिळाली असून, पहिल्या भागासाठी ऋषभ शेट्टीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. दुसऱ्या भागानेही ही परंपरा पुढे चालवत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी छाप पाडली आहे.चित्रपटाच्या यशामागे त्याच्या मजबूत कथानक, सखोल मायथॉलॉजिकल संदर्भ आणि पारंपरिकतेला आधुनिकतेशी जोडणारी कथा आहे. ऋषभ शेट्टी यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन स्वतः केले असून, त्यांनी प्रेक्षकांना एक वेगळा अनुभव दिला आहे. 'कांतारा चैप्टर १' मधील दृश्यरचना, संवाद आणि पार्श्वसंगीत याला भरभरून दाद मिळतेय.

चित्रपटाच्या यशानंतर ऋषभ शेट्टी यांनी सोशल मीडियावर चाहत्यांचे आभार मानले. फिल्म ट्रेड तज्ज्ञांच्या मते, 'कांतारा चैप्टर १'ने वीकेंडमध्ये मिळवलेली कमाई पाहता, जर वीकडेजमध्येही अशीच गती राहिली, तर पुढील आठवड्याच्या शेवटी हा चित्रपट ५०० कोटींचा आकडा सहज पार करू शकतो. चित्रपटात ऋषभ शेट्टीसोबत रुक्मिणी वसंत, गुलशन देवय्या आणि जयराम यांच्याही भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या आहेत.कांतारा'सारख्या चित्रपटांचा राष्ट्रपती भवनात सन्मान होणे हे केवळ दक्षिण भारतीय सिनेमा नव्हे, तर संपूर्ण भारतीय चित्रपटसृष्टीसाठी अभिमानाची गोष्ट आहे. एक सशक्त कथा, सांस्कृतिक मुळांशी नातं आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम मांडणी यामुळे 'कांतारा चैप्टर १' अनेक पातळ्यांवर यशाचे शिखर गाठत आहे.



# गीतकार प्रसून जोशी यांना किशोर कुमार सन्मान २०२४ जाहीर

**मुंबई :** प्रसिद्ध गीतकार, कवी आणि लेखक प्रसून जोशी यांना मध्य प्रदेश सरकारचा प्रतिष्ठित 'किशोर कुमार सन्मान २०२४' प्रदान करण्यात येणार आहे. गीतलेखन क्षेत्रात त्यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाची दखल घेत हा सन्मान त्यांना जाहीर करण्यात आला आहे. राज्य सरकारच्या सांस्कृतिक विभागाचे संचालक एन.पी. नामदेव यांनी याबाबत अधिकृत माहिती दिली.

हा सन्मान ङीरिप गौहळ १४ ऑक्टोबर रोजी खंडवा येथे आयोजित समारंभात मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या हस्ते प्रसून जोशी यांना प्रदान करण्यात येणार आहे. खंडवा हे सुप्रसिद्ध गायक किशोर कुमार यांचे जन्मगाव असून, त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी या सन्मानाचे आयोजन केले जाते. यंदाचा दोन दिवसीय कार्यक्रम १३ ऑक्टोबरपासून सुरू होणार असून, पहिल्या दिवशी स्थानिक गायक-कलाकारांकडून सुगम संगीताच्या विविध सादरीकरणांचे आयोजन करण्यात आले आहे.

१९९७ साली सुरू झालेल्या या सन्मानाचे स्वरूप पाच लाख रुपये रोख आणि एक मानपत्र असे आहे. किशोर कुमार सन्मान दरवर्षी चित्रपट क्षेत्रातील अभिनय, पटकथा लेखन, गीतलेखन व दिग्दर्शन अशा विविध विभागांतील प्रतिष्ठित व्यक्तींना दिला जातो. यापूर्वी या सन्मानाने ऋषिकेश मुखर्जी, नसीरुद्दीन शाह, गुलजार, कैफी आजमी, बी.आर. चोप्रा, अमिताभ बच्चन, गोविंद निहलानी, जावेद अख्तर, श्याम बेनेगल, यश चोप्रा, देव आनंद, सलीम खान, समीर, प्रियदर्शन, वहीदा रहमान, अमिताभ भट्टाचार्य, धर्मेंद्र आणि राजकुमार हिरानी यांसारख्या दिग्गज कलावंतांचा गौरव करण्यात आला आहे.



प्रसून जोशी हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व मानले जातात. त्यांनी अनेक कालजयी चित्रपट गीतांना शब्दबद्ध केले असून, त्यांच्या लेखणीतून उमटलेले शब्द भावनिक समृद्धता आणि साहित्यिक मूल्यांनी परिपूर्ण असतात. 'तारे जमीं पर', 'रंग दे बसंती', 'भाग मिल्खा भाग', 'नीरजा', 'मनिकर्णिका' आणि 'दिल चाहता है' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांची गीते प्रेक्षकांच्या मनात कायमची कोरली गेली आहेत.हा सन्मान मिळणं ही फक्त प्रसून जोशी यांच्यासाठी नव्हे, तर समग्र गीतलेखन परंपरेसाठीही एक सन्मानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया चित्रपटसृष्टीतून व्यक्त होत आहे.

## मिहिरची तुलना केली श्रीरामाशी ; क्यो की सास भी.. वर चांगलेच भडकले प्रेक्षक

**मुंबई :** एकता कपूरचा लाडका शो 'क्यों की सास भी कभी बहू थी' ही मालिका सध्या ट्रोलरच्या निशाण्यावर आली आहे. याला कारण आहे या मालिकेत झालेली मिहिरची एंट्री.... टीआरपीमध्ये कायम दुसऱ्या किंवा तिसऱ्या असलेली ही मालिका प्रेक्षकांना भलतीच आवडली आहे.

अलीकडेच रिलीज झालेल्या दसरा थीमवरील एपिसोडमध्ये अमर उपाध्याय साकारत असलेल्या मिहिर आणि प्रभू श्रीराम यांच्या व्यक्तिरेखेत समानता दाखवली गेली आहे. प्रेक्षकांना ही तुलना अजिबात आवडलेली दिसत नाही. लोकांनी हा देवाचा अपमान असल्याचे म्हणले आहे.

या एपिसोडमध्ये मिहिर आपली पत्नी तुलसीशी झालेल्या वादानंतर दसऱ्यातील हवनसाठी घरी येतो. त्याची घरात एंट्री होते तशी बॅकग्राऊंडला 'राम राम जय राजा राम, राम राम जय सीता राम' हे संगीत वाजू लागते. तसेच तुलसी आणि मिहिरला देखील फ्रेममध्ये दाखवले जाते.



या तुलनेवर लोक चांगलेच भडकले आहेत.

एका पोस्टच्या कमेंटमध्ये लोक म्हणतात, 'आतापर्यंत लिहिलेल्या सगळ्यात टॉक्सिक व्यक्तिरेखांपैकी मिहिर एक आहे. त्याला अशाप्रकारे महान बनवणे आणि श्रीराम यांच्याशी जोडणे हा भारतीय मूल्यांचा अपमान आहे.' एकजण म्हणतो, ' मला खूप वाईट वाटते जेव्हा मिहिर- तुलसीला राम सीतेची जोडी म्हणले जाते. खरे तर बाहेर अफेअर असलेल्या व्यक्तीची तुलना श्रीरामांशी करणेही चुकीचे आहे.'

# अण्णासाहेब पाटील महामंडळाचा मोठा निर्णय : व्याज परताव्यासोबतच आता उद्योजकता प्रशिक्षण


जनसंचलन/बुलढाणा

आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या तरुणांना सक्षम उद्योजक बनविण्यासाठी कार्यरत असलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने एक महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. महामंडळ आता केवळ बँक कर्जावरील व्याज परतावा योजनाच नव्हे, तर लाभार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक उद्योजकता प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देखील देणार आहे. हा निर्णय तरुण उद्योजकांना केवळ आर्थिक मदत न देता, त्यांना व्यवसाय यशस्वीपणे चालवण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये मिळवून देण्याच्या उद्देशाने घेण्यात आला असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी दिली. या उपक्रमाचा भाग म्हणून महामंडळाच्या वतीने ङ्कउद्योग सारथीफ प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत २४ सप्टेंबर २०२५ रोजी ऑनलाईन वेबिनार आयोजित करण्यात आले. या वेबिनारमध्ये ङ्कपशुपालन आणि दुग्ध व्यवसायफ या विषयावर पुणे कृषी विद्यालयाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम युट्युब आणि फेसबुकवर थेट प्रसारित करण्यात आला. वेबिनारदरम्यान डॉ. माने यांनी दुग्ध व्यवसायातील यशस्वीतेसाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर प्रकाश टाकला. त्यांनी उत्तम जातीच्या जनावरांची निवड, आहार नियोजन, आरोग्य व लसीकरण, तसेच आर्थिक व्यवस्थापन आणि विपणन तंत्र यावर सखोल माहिती दिली. तसेच, गीर, साहिवाल, जर्सी यांसारख्या देशी व विदेशी जातींचे फायदे, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उत्पादन व व्यवस्थापनात होणारी सुधारणा याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. डॉ. माने यांनी सांगितले की, ङ्कदुग्ध व्यवसाय हा केवळ उत्पन्नाचा स्रोत नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा एक महत्त्वाचा घटक आहे. योग्य प्रशिक्षण, नियोजन आणि शाश्वत व्यवस्थापनामुळे हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात यशस्वी होऊ शकतो.फ्फ ८या वेबिनारमध्ये राज्यभरातून अनेक युवक, महिला उद्योजिका आणि स्वयंसहायता गट प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. लाभार्थ्यांनी थेट प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन केले. पुढील काळात राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये अशा ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असून, तज्ञांच्या मार्गदर्शनातून तयार झालेले उद्योजक आपला व्यवसाय अधिक सक्षमपणे वाढवतील, असा विश्वास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी व्यक्त केला.

# कै.वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलांडे यांचा जिल्हा दौरा

जनसंचलन/बुलडाणा

कै.वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलांडे (पाटील) हे बुधवार दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दुपारी २ वाजता सिंदखेड राजा येथील विश्रामगृह येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या, चारा लागवड व अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व करण्यात आलेली मदत यासंबंधी बैठक, दुपारी ३ वाजता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट, दुपारी ४.१५ वाजता देऊळगाव राजा येथील विश्रामगृह येथे अधिकाऱ्यांसमवेत बैठक, साय. ५ वाजता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट, सायं. ५.४५ वाजता सिंदखेड राजा मार्गे अमरावतीकडे प्रयाण करतील.




# केंद्र शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा-केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव

## दिशा समितीच्या बैठकीत योजनांच्या प्रगतीचा घेतला आढावा...

जनसंचलन/ बुलढाणा

केंद्र शासनाच्या योजना तळागळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री तथा ङ्कदिशाफ समितीचे अध्यक्ष ना. प्रतापराव जाधव यांनी प्रशासनाला दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण अर्थात ङ्कदिशाफ समितीची बैठक जिल्हा नियोजन समिती सभागृहात मंगळवारी पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, प्रकल्प अधिकारी पी.एस.कोळसे यांच्यासह उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी या बैठकीत केंद्र सरकारच्या योजनांच्या प्रगतीचा तब्बल चार तास सविस्तर आढावा घेतला. यात त्यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करण्याआधी प्रस्तावित जागेत रस्ते, वीज, पाणी यासह मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सर्वेक्षण करावे. लोकांच्या तक्रारी येता कामा नये. प्रस्तावित पुनर्वसन गावांमध्ये दर्जेदार व चांगल्या सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी नव्याने कार्यपद्धती अवलंबण्याबाबत शासनाला पाठवलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले. ते पुढे म्हणाले, पीक विमा नुकसान भरपाईपासून पात्र शेतकरी वंचित राहु नये. ई-केवायसी अभावी पीक विमा मोबदल्यापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांच्या नावांची यादी ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करुन त्याचे चावडी वाचन करावे. फळबाग पीक विमा नुकसान भरपाई प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करा. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत ई-केवायसीबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. ई-केवायसी करण्यासाठी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना केंद्रीय राज्यमंत्री ना. जाधव दिल्या. केंद्रीय राज्यमंत्री ना. जाधव यांनी आढावा घेतांना पीएम- सूर्यघर मोफत वीज योजनेचा प्रचार प्रसार करा. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पांना गती द्या. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विशिष्ट मोटार पंप खरेदी करण्याबाबत सक्ती करु नका. त्यांना मोटार पंप खरेदीचे स्वातंत्र्य द्या. अतिवृष्टी, वादळवाऱ्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या सौर पॅनलचे नुकसान झाल्याच्या तक्रारी असून त्यांच्या तक्रारींचे निरसन करा. मनरेगा योजनेंतर्गत जास्तीत जास्त लोकहिताचा कामे वाढवा, सिंचन विहिरी बाबतीत गैरव्यवहार व पैशांसाठी लाभार्थ्यांची अडवणूक होत असल्याच्या तक्रारी असून याला आळा घालावे. सिंचन विहिर मंजुरीपासून ते काम पूर्ण होईपर्यंतच्या प्रक्रियेचा कालबद्ध कार्यक्रम राबवा. याबाबत लोकांमध्ये जनजागृती करावी. मनरेगाअंतर्गत ग्रामपंचायत भवन, स्मशानभूमी आणि शाळांच्या वर्गखोल्यांचे बांधकाम करा. जिल्हा व उपजिल्हा सामान्य रुग्णालयाप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रात आयुष विभाग सुरु करा. आयुष विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्या. आयुष्मान भारत कार्ड वितरणाचे उद्दिष्ट पूर्ण करा. लाभार्थ्यांना माहिती द्या. पीएम पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार दिले जाते का याची तपासणी करा. भारतनेटचा वापर खासगी यंत्रणा वापरत असेल तर ती तात्काळ बंद करा. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये इंटरनेट सेवा सुरु करा. अडीअडचणीबाबत तपासणी करा व गट विकास अधिकाऱ्यांनी बैठका घेवून उपाययोजना कराव्यात. डिजिटल इंडिया अंतर्गत ग्रामपंचायती डिजिटल करुन लोकांना सेवा द्या. सीएससी सेंटर, आधार सेवा



केंद्रांवर नागरिकांची लुट सुरु असल्याच्या तक्रारी असून अशा केंद्रांची तपासणी करा, आढावा घेवून कारवाई करा, अशा सूचना केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीत केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प, पुनर्वसन, प्रधानमंत्री पीक विमा योजना, पीक विमा नुकसान भरपाई, पीक कापणी प्रयोग पद्धती, फळबाग पीक विमा, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, पीएम- सुर्यघर मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, १५ वा केंद्रीय वित्त आयोग निधी व खर्च, प्रधानमंत्री आवास योजना, अटल भूजल, राष्ट्रीय आरोग्य अभियान, पीएम पोषण शक्ती निर्माण योजना, पीएम श्री शाळा, अंगणवाडी केंद्र बांधकाम, भारतनेट, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे स्थानक, उड्डाण पुलांच्या कामांचा सविस्तर आढावा घेतला.

# शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा - ॲड. निलेश हेलोंडे

**जनसंचलन/ बुलढाणा**

केंद्र व राज्य शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना सुरु आहेत. त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्यासाठी प्रशासनाने सातत्याने पाठपुरावा करण्याचे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी दिले. ते बुधवारी सिंदखेड राजा तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात त्यांनी तालुक्यातील शेतकरी आत्महत्या, चारा लागवड व अतिवृष्टीमुळे नुकसान व मदतीसंदर्भात आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. ॲड. निलेश हेलोंडे यांनी तालुक्यातील शेती पद्धतीचा आढावा घेतांना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. शेतकऱ्यांनी पारंपरिक पीकांबरोबर चिया, रेशीम, चारा लागवडीला प्राधान्य देण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. चिया, रेशीम लागवडीसाठी शेतकऱ्यांना मदत करावी. शेतकरी समृद्ध व्हावा यासाठी सर्वांनी महत्त्वाची भूमिका घ्यायला पाहिजे. कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहेत या तंत्रज्ञानाच्या आधारे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी प्रोत्साहित करावे. कृषी विभागाने शासनाच्या योजना शेतकऱ्यापर्यंत पोहोचवावी. योजनांची अंमलबजावणी गतीने झाली पाहिजे. तालुक्यात प्रक्रिया उद्योग आणि दुग्ध व्यवसायाला चालना द्यावी, चारा लागवडीचे प्रमाण वाढवावे, रोजगार व स्वयंरोजगार निर्माण करावे. उद्योग सुरु करु इच्छिणाऱ्यांना कर्ज पुरवठा झाला पाहिजे. शाश्वत बाजारपेठ, गोदाम उपलब्ध करुन द्यावे. शेतकऱ्यांच्या बांधावर प्रयोगशाळा सुरु कराव्यात, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. शेतकरी सक्षम झाला पाहिजे. ही माझी भूमिका असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीला तहसीलदार अजित दिवटे, तालुका कृषी अधिकारी भागवत किंगर, गटविकास अधिकारी अभिजित बांगर, पोलीस निरिक्षक अमोल इंगळे, भास्कर घुगे, महिला बालकल्याण विभागाचे अधिकारी जीवन राठोड आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदाच्या आरक्षणाची सोडत १३ ऑक्टोबरला

**जनसंचलन/बुलढाणा**

ऑक्टोबर (जिमाका): जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदाच्या आरक्षणाची सोडत १३ ऑक्टोंबर रोजी काढण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी दिली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा वपंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम २०२५ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/नागरिकांचा मागासप्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवायच्या जागा अणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या जागा निश्चित करण्यात येणार आहेत. त्याकरीता सोडत पध्दतीने कार्यवाही करण्याकरीता विशेष सभा आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद बुलढाणा करिता आरक्षण सोडतीची सभा ही नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे होणार आहे. बुलढाणा पंचायत समितीची आरक्षण सोडतही याचं ठिकाणी होणार आहे. तसेच बुलढाणा व्यतिरिक्त इतर सर्व पंचायत समितीच्या आरक्षण सोडत संबंधित तहसिल कार्यालयाच्या सभागृहामध्ये काढण्यात येणार आहे. या आरक्षणाचा प्रारुप १४ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जिल्हा परिषद गटांच्या आरक्षणाची सोडत ही १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.३० काढण्यात येणार आहे. याच दिवशी बुलढाणा, देऊळगाव राजा, सिंदखेडराजा, मेहकर, लोणार, खामगांव, शेगांव, जळगांव जामोद, संग्रामपुर, मलकापुर, नांदुरा आणि मोताळा या पंचायत समिती गणांची सोडत ही अनुक्रमे सकाळी ११ व दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यामधील प्रारुप आरक्षणावर जिल्हाधिकारी किंवा संबंधित तहसिलदारांकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी हा १४ ते १७ ऑक्टोंबरपनर्यंतचा राहणार आहे. या कालावधीत हरकती व आक्षेप नोंदवता येणार आहे. जिल्हा परिषद गट अथवा पंचायत समिती गणातील रहिवाशांनी या सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.

# ॲड.शरद राखोंडे आणि संदीप शेळके यांनी वाढवली जिल्ह्याची शान - ॲड.जयश्री शेळके




**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा जिल्ह्याचे सुपुत्र ॲड.शरद राखोंडे आणि संदीप शेळके यांनी नुकत्याच दक्षिण कोरिया येथील गुऱ्हे येथे ङ्गङ्घफ्र या जागतिक दर्जाच्या ट्रायथलॉन स्पर्धेत यशस्वी सहभाग नोंदवून बुलढाण्याचे नाव जागतिक पातळीवर उंचावले आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या पार्श्वभूमीवर आज बुलढाण्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांच्या हस्ते या दोन्ही खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या दोन्ही बुलढाण्याच्या सुपुत्रांनी जागतिक स्तरावर आपली छाप सोडली आहे. त्यांनी दाखवून दिलं की इच्छाशक्ती, कष्ट आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतंही लक्ष्य साध्य करता येतं. त्यांच्या यशाने संपूर्ण बुलढाणा जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे.फ्र असे प्रतिपादन यावेळी ॲड.जयश्री शेळके यांनी केले. ही दक्षिण कोरियातील अत्यंत कठीण मानली जाणारी स्पर्धा असून, यात ३.८ किमी पोहणे, १८० किमी सायकलिंग आणि ४२.२ किमी मॅराथॉन धावणे असे एकत्रित तीन टप्पे असतात. या स्पर्धेत ॲड.शरद राखोंडे आणि संदीप शेळके यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यशस्वीरीत्या सर्व टप्पे पूर्ण केले. दोन्ही खेळाडूंनी आपल्या कामगिरीचे श्रेय सतत केलेल्या प्रशिक्षणाला, कुटुंबाच्या पाठबळाला आणि ङ्गङ्घ -फ्र या त्यांच्या संघाला दिले. बुलढाण्याचे हे दोन्ही खेळाडू आता पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी सज्ज होत असून, त्यांच्या कामगिरीमुळे जिल्ह्यातील युवकांमध्ये क्रीडाप्रेरणा जागृत झाली आहे. या प्रसंगी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत, जिल्हा संघटक ॲड.सुमित सरदार, तालुकाप्रमुख विजय इतवारे, युवासेना शहरप्रमुख अनिकेत गवळी, सुधाकर मुंढे, प्रकाश डोंगरे इ.उपस्थितहोते.

# सैनिक सभामंडप सर्वांसाठी भाड्याने उपलब्ध

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने चालविण्यात येणारा सैनिक सभामंडप सर्वसामान्य नागरिकांसाठी भाड्याने उपलब्ध करण्यात आला आहे. सर्व सुविधा असलेला हा सुसज्ज व भव्य सभामंडप बुलढाणा एस.टी. बस स्थानकापासून केवळ २५ मीटर अंतरावर असून लग्न समारंभ, वाढदिवस, सभा व इतर कार्यक्रमांसाठी योग्य व माफक दरात देण्यात येत आहे. माजी सैनिक, त्यांच्या विधवा आणि अवलंबितांसाठी विशेष सवलतीची तरतूद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, बुलढाणा यांनी केले आहे.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८